**देहुरोड पोलीस स्टेशन,**
**पिंपरीचिंचवड पोलीस आयुक्तालय**
पत्ता:-जुना पुणे-मुंबई हायवे, सेंट्रलचौक, देहुरोड, पुणे.
फोन नं.०२०-२७६७१२८८
ई-मेल आयडी-psdehuroad.pcpc-mh@gov.in


दिनांक ०६/०३/२०२४

# देहुरोड पोलीस स्टेशन तपास पथकाची कामगीरी

## जुन्या भांडणाच्या कारणावरून डोक्यात लाकडी दांडके, सिमेंटची कुंडी व सिमेंटचे गट्टु घालुन हत्या करणाऱ्यांना तात्काळ देहूरोड पोलीसांकडून अटक

देहुरोड पोलीस स्टेशन हद्दीमध्ये दि.०६/०३/२०२४ रोजी रात्री ००/३०वा चे सुमारास देहूरोड पोलीस स्टेशन हद्दीमध्ये एका इसमास अनोळखी इसमांनी डोक्यात लाकडी दांडके, सिमेंटच्या ब्लॅकने तसेच सिमेंटच्या कुंडीने मारून गंभीर जखमी केलेबाबत नियंत्रण कक्षास कॉल प्राप्त झाला. देहूरोड पोलीस सदर ठिकाणी जावुन जखमी इसम नामे विशाल विजय थोरी वय - २४ वर्षे रा. संगिता अपार्टमेंट फ्लॅट नं. ०३ विकासनगर गणपतीमंदीराजवळ देहुरोड ता. हवेली जि.पुणे यास औषधउपचार कामी वाय.सी.एम. हॉस्पीटल येथे ॲडमीट केले असता औषध उपचार दरम्यान तो मयत झाला. त्याबाबत देहूरोड पो.स्टे गु.रजि.नं.१०७/२०२४ भादंवि कलम ३०२,१४३,१४७,१४९,५०६ अन्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. सदर गुन्ह्यातील आरोपीबाबत कोणतीही माहिती उपलब्ध्द नसताना मा. पोलीस उपआयुक्त, परिमंडळ-२ श्री. बापू बांगर सो यांनी समक्ष भेट देवुन आरोपी अटकेबाबत सुचना देऊन पोलीस स्टाफ रवाना केला. दाखल गुन्ह्यातील घटनास्थळावर तसेच मयताचे नातेवाईकांकडे केलेल्या तपासात सदर गुन्हा आरोपी नामे १)रोहन राजेश देशमुख वय.२३ वर्षे, रा. विकासनगर, देहुरोड,पुणे २) सुयश विलास देशमुख वय.२६ वर्षे, रा. सदर, ३) अमित कैलास वरगडे वय. २४ वर्षे, रा. स्वराजनगरी, तळेगाव चाकण रोड, तळेगाव दाभाडे, ता. मावळ, जि. पुणे,४) वैभव शिवाप्पा ओनी वय.२० वर्षे, रा. स्वराजनगरी, तळेगाव चाकण रोड,तळेगाव दाभाडे,ता. मावळ, जि. पुणे व त्याचे साथीदारांनी केल्याचे निष्पन्न झाले असुन त्यांना दाखल गुन्ह्यात तात्काळ अटक करण्यात आले असुन देहूरोड पोलीस अधिक तपास करीत आहे.

सदरची कामगिरी मा. पोलीस आयुक्त सो, श्री. विनयकुमार चौबे सो, मा. अपर पोलीस आयुक्त श्री. वसंत परदेशी सो, मा. पोलीसउपायुक्त परिमंडळ–२ बापू बांगर सो, मा. सहाय्यक पोलीस आयुक्त, देहुरोड विभाग श्री. घेवारे सो. वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री. नितीन फटांगरे, यांच्या प्रत्यक्ष मार्गदर्शनाखाली सहायक पोलीस निरीक्षक आशिष जाधव, पोलीस अमंलदार प्रशांत पवार, बाबा क्षिरसागर, बाळासाहेब विधाते, सुनिल यादव, विजय गेंगजे किशोर परदेशी, प्रशांत माळी, केतन कानगुडे, संतोष महाडीक, मोहसिन आत्तार, युवराज माने, शुभम बावनकर, स्वप्नील साबळे, निलेश जाधव यांनी सदरची उल्लेखनीय कामगिरी केली आहे.

(बापु बांगर)
पोलीस उपआयुक्त
परिमंडळ -०२, पिंपरी-चिंचवड.